# देवमाणूस

मी श्री. पोपट रंगनाथ सातपुते. माझी मुलगी कु. कृतिका पोपट सातपुते वय वर्षे १८ ही दि. २५/०३/२०२३ रोजी निमोनिया झाल्यामुळे संगमनेर येथील कुटे हॉस्पिटल येथे ॲडमिट होती. पण तिची अवस्था खूप गंभीर होती. त्यामुळे तिच्यावर योग्य ते उपचार होणे आवश्यक होते. त्यावेळी मंगळवारच्या व्हिजिट साठी नाईन पल्स हॉस्पिटलचे डॉ. दिनेश वाघ यांनी कृतिकाला चेक केले. व ब्रँकोस्कोपी करण्याचा सल्ला दिला. संगमनेरला ब्रँकोस्कोपी करणे धोक्याचे होते कारण तिची श्वास घेण्याची गती खूपच कमी झाली होती. संगमनेरचे डॉ. वर्पे, डॉ. कर्पे, डॉ. जाधव यांनीही पेशंटची अवस्था पाहता वाघ सरांकडेच जाण्याचा सल्ला दिला.

आमचा मेडिक्लेम असल्यामुळे वाघ सरांनी अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलला ॲडमिट करण्यास सांगितले. तो पर्यंत पेशंटची स्थिती आणखीच खालवली होती. तिची ब्रँकोस्कोपी करताना वाघ सरांबरोबरच डॉ. काकड, डॉ. मर्दा इ. होते. व यांच्या मदतीने ब्रँकोस्कोपी झाली. पण टेस्ट नंतर तिला आणखी १००%. ऑक्सिजन ची गरज भासू लागली. आमच्या केसबद्दल कोणत्याच डॉक्टरला आशा नव्हती. पण डॉ. दिनेश वाघ यांनी स्वत: आमच्या केस च्या अभ्यास केला. व इतर डॉक्टरांच्या मदतीने सातत्याने प्रयत्न केले. अखेर तिला व्हेन्टीलेटर वर ठेवण्याचा निर्णय घेतला. व तो तिच्यासाठी खूप योग्यही ठरला. व्हेन्टीलेटर वर ठेवल्यानंतरही तिला वेगवेगळ्या पोझिशन मध्ये झोपवून रिकव्हर करण्याचा प्रयत्न केला.

Scanned with OKEN Scanner

व्हेन्टिलेटर वर ठेवल्यानंतर अगदी तिसऱ्या दिवशीपासूनच पेशन्ट रिकव्हर होत चालले. ऑक्सिजन हळूहळू कमी लागायला लागला व त्याबरोबरच BP चे इंजेक्शनही बंद झाले. व चौथ्या दिवशी पेशंटने डोळे उघडले. व पाचव्या दिवशी व्हेन्टिलेटर बंद करण्यात आले. त्यानंतर आठ दिवसातच ती बऱ्यापैकी रिकव्हर झाली.
वाघ डॉक्टरांबरोबरच अशोका मेडिकव्हरचा पुर्ण स्टाफ, नर्स, डॉक्टर या सर्वांचे अतिशय मोलाचे सहकार्य लाभले. मुलीला घाबरलेल्या कंडिशन मधून बाहेर काढण्यासाठी तेथील सिस्टर, ब्रदर्स यांनीही खूप प्रयत्न केले.

डॉक्टर वाघ यांच्या रूपात माझ्या पत्नीला स्वामी समर्थच दिसले. ती मुलीच्या बाबतीत फार ठाम राहिली ती म्हणायची की "जर कृतिकाला काही फरक पडेल तर तो इथेच पडेल" डॉ. दिनेश वाघ यांनी वेळोवेळी आम्हाला खूप धीर दिला. त्याचबरोबर आमचे आर्थिक बजेटही डगमगले असता डॉक्टर धीर देत म्हणाले "मी माझी फी कमी करू शकतो / होणार नाही" त्यांच्या या शब्दाने आम्हाला आणखी धीर आला.

पेशंटचे आईवडील, नातेवाईक म्हणून तर आम्ही दुःखात होतोच पण आमच्यापेक्षाही पेशंटची जास्त काळजी डॉक्टरांना आहे असेच त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होते. या दरम्यान जेव्हा जेव्हा डॉक्टरांची व्हीजिट होत होती तेव्हा-तेव्हा पेशंटची मावशी म्हणायची "डॉक्टर जाताना चेहऱ्यावर थोडीशी स्माईल ठेवत जा म्हणजे पेशंटच्या नातेवाईकांनाही बरे वाटेल" पण डॉक्टरांच्या चेहऱ्यावर खरी स्माईल आली ती

पेशंट बरी झाल्यावरच. आमच्या त्या दरम्यान लक्षात आले की त्या काळात डॉ. दिनेश वाघ आपले वैयक्तिक आयुष्य जगतच नव्हते. ते फक्त आणि फक्त पेशंटला लवकर कसं बरं करता येईल याचा विचार करत होते.

मी सर्व लोकांना विनंती करतो की जर अशी वेळ कुणावर आलीच तर कुठलाही विचार न करता नाशिकला 'नाईन पर्ल्स' हॉस्पिटलला डॉ. दिनेश वाघ यांच्याशी संपर्क करावा " डॉ. दिनेश वाघ यांच्या रूपात साक्षात देव आम्हाला भेटला" असे आम्हाला वाटते.

आम्ही सातपुते परिवाराकडून डॉ. दिनेश वाघ व त्यांच्या संपूर्ण टिम ला धन्यवाद करतो.

डॉ. दिनेश वाघ यांनी ज्याप्रकारे आमच्या मुलीला जीवनदान दिलं त्यामुळे ते आम्हां सर्वांसाठी 'देवमाणूस' ठरले.